बुधवार, दि १८ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक १३ वा ● किंमत २ रु. ● पाने ४ RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

### इंदरानगर येथील हारून कुरेशी यांचा अपघातात मृत्यू प्रकरण; पोलीस तपासात होत आहे विलंब

# मुस्लीम समुदायाचा पोलीस ठाण्यात ठिय्या

**मंठा । प्रतिनिधी -** शहरातील इंदरानगर येथील रहिवासी हारून इब्राहिम कुरेशी (वय ५२) यांचा काल संध्याकाळी तळणी फाटा परिसरात साडेसहाच्या सुमारास अज्ञात टिप्परच्या धडकेत दुर्दैवी मृत्यू झाला. हारून कुरेशी हे लोखंडाच्या व्यापाराचे दुकान चालवत होते. संध्याकाळी दुकान बंद करून मोटारसायकलने (क्रमांक MH21J9257) घरी परतत असताना गोपाळराव बोराडे यांच्या पेट्रोल पंपाजवळ अज्ञात टिप्परने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली.



या धडकेत गंभीर जखमी झालेल्या हारून कुरेशी यांना तात्काळ मंठा येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर टिप्पर चालक घटनास्थळावरून फरार झाला असून, पोलिस तपास सुरू आहे. गावातील लोकांच्या मते अपघात करणारा टिप्पर रस्त्यावरील दुकाने, हॉस्पिटल्स, आणि मॉलच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. तरीही, पोलिस तपासात होत असलेल्या विलंबामुळे मयत हारून कुरेशी यांचे नातेवाईक आणि स्थानिक नागरिक तीव्र नाराज होते .तपासाला गती मिळावी आणि आरोपीला अटक व्हावी, या मागणीसाठी मयताचे नातेवाईक आणि शहरातील मुस्लिम समाजाचे नागरिक मंठा पोलीस ठाण्यात ठिय्या मारून बसले होते काही तास चाललेल्या या आंदोलनाम ुळे पोलिसांवर दबाव वाढला.सीसीटीव्ही फूटेज असूनही तपास का होत नाही? पोलिस प्रशासन कोणाच्या दबावाखाली आहे का? असा सवाल आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला.




हारून कुरेशी यांच्या कुटुंबीयांनी ठाम भूमिका घेतली की, आरोपी टिप्पर चालकाचा शोध लागेपर्यंत अंत्यविधी होणार नाही. या प्रकरणात पोलिसांनी दोन संशयित टिप्पर ताब्यात घेतले असून, पोलिस निरीक्षक निकाळजे आणि डिवायएसपी साहेबांनी आश्वासन दिले की, दोषींवर कठोर कारवाई केली जाईल.तपासात होणाऱ्या विलंबामुळे कुटुंबीय आणि समाज बांधवांनी मोठा निर्णय घेत तब्बल २३ तासांनंतर मोठ्या कबरस्तानमध्ये मयताचे अंत्यविधी केले. या अपघातामुळे शहरात तीव्र रोष पसरला आहे. पोलिस तपासातील विलंबामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी असून, न्याय मिळेपर्यंत कुटुंबीय आणि समाज संघर्ष करण्यासाठी तयार असल्याचे सम ाजबांधव सांगत आहेत.

### पालक मंत्री ...

वादा वादी शिगेला
ते पालकमंत्री पद
उत्सुक अनेकजण
एक खुर्ची एक पद
मिटक्या मारे सगळे
ओठाला लावा मध
वाली सुग्रीव भांडण
पहात राहतो अंगद
अन्याय माझ्यावरी
मना माजे खदखद
हक्क आमचा फक्त
चालू ठेवावे पालुपद
तिसरा बसला मस्त
अडवत रहा पदोपद
भोवताली बसे सारे
पदकठेवले मधोमध
जुनी वादावादी निघे
बसता मुडदे खोदत
काखेत असे कळसा
गावभर रहावे शोधत
निर्णय घ्यावा उशीरा
घोंगडे ठेवावे भिजत
बिरबल राहतो हसत
खिचडी बसे शिजत

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### इन्नरव्हील होरायझनतर्फे पिंपरखेड ग्रामपंचायतला आरोग्य किट प्रदान

# आरोग्याच्या बाबतीत सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न - ॲड. अश्विनी धन्नावत

**जालना । प्रतिनिधी -** इन्नरव्हील होरायझन, इन्नरव्हील क्लब ऑफ जालना आणि इन्नरव्हील क्लब ऑफ जालना सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने घनसावंगी तालुक्यातील पिंपरखेड ग्रामपंचायतला आरोग्य किट प्रदान करण्यात आली. या किटमध्ये हॉस्पिटल बेड, व्हीलचेअर, वॉकर, आणि टॉयलेट चेअर या अत्यावश्यक साधनांचा समावेश आहे. या किटमुळे आजारी आणि गरजू रुग्णांसाठी ग्रामपंचायतीच्या माध्यम ातून मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहे.

जालना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने १५ डिसेंबर रोजी घनसांगी आयोजित विधी सेवा महाशिबीर, शासकीय सेवा व योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती व जालना जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती संदीपकुमार मोरे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, अतिरिक्त पोलिस अधीक्षक आयुष नोपाणी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव श्रीमती प्रणिता भारसाकडे, जिल्हा सरकारी अभियोक्ता ॲड. बाबासाहेब इंगळे, ॲड. विकास पिसुरे, फोटो संघाचे घनसावंगी तालुका **पान २ वर**



## टेंभुर्णी येथे रास्ता रोको आंदोलन; भीमसैनिकांचा ठिय्या

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** परभणी येथील संविधान अवमान प्रकरणासह न्यायालयीन कोठडीत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणाचा जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी येथे भीमसैनिकाडून तीव्र शब्दात निषेध करण्यात आला. यावेळी जाफराबाद ते जालना रोडवर काही काळ ठिय्या करीत रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

टेंभुर्णी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरातून आंबेडकरी समाजबांधवांनी मोर्चा काढला. सदर मोर्चा शिवाजी चौकात नेण्यात आल्यानंतर तेथे काही काळ सरकार व पोलिस प्रशासनाविरोधात जोरदार घोषणा देण्यात आल्या. दलित वस्ती मध्ये कोंबिंग ऑपरेशन करून दलित समाजातील तरुणांना मारहाण करीत पोलिसांनी खोट्या गुन्ह्यात आडकवून महिला व पुरुषांना म ारहाण केली. तसेच लाठीचार्ज केल्याप्रकरणी टेंभुर्णी येथील समाज बाधंवानी जाहीर निषेध व्यक्त केला. यावेळी सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र देशमाने यांना निवेदन देण्यात आले. यावेळी प्रदीप गुडू मघाडे, गौतम म्हस्के, दीपक शिंदे, आशिष पैठणे, प्रकाश बोर्डे, संतोष मघाडे, कमलबाई मघाडे, कुशीर्वताबाई चंदनशिवे, मथुराबाई मघाडे, कौशल्य बाई चंदनशिवे, लक्ष्मीबाई म्हस्के, धोंडाबाई दांडगे, शशीकलाबाई मघाडे, अनिता मघाडे यांच्यासह भीमसैनिक उपस्थित होते. रास्ता रोको आंदोलनाम ुळे काही काळ टेंभुर्णी - जाफरबाद रस्त्यावराल वाहतूक ठप्प झाली होती.

## मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या लाभार्थ्यांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** राज्यातील ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी व वयोमानापरत्वे येणाऱ्या अपंगत्व, अशक्तपणावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने, उपकरणे खरेदीसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना सुरु करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यात मुख्यमंत्री वयोश्री योजनेतंर्गत ५ हजार ११३ पात्र लाभार्थींना शासनाकडून प्रत्येकी ३ हजार रुपये आधार संलग्न बँक खात्यात रक्कम जमा केली आहे. तरी अशा लाभार्थ्यांनी शासन निर्णयातील नियमानुसार साहित्य, उपकरणे खरेदी करुन त्याचे देयक (पावती) सहायक आयुक्त सम ाजकल्याण जालना यांच्या कार्यालयात जमा करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# संपादकीय

## पत्नी पीडितांना संरक्षण!

बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्यावरील आपबिती ९० मिनिटांचा व्हिडिओ काढून तसेच ४० पाणी सुसाईड नोट लिहून सांगितली. या तरुणाला त्याच्या पत्नी आणि सासरच्यांनी हुंडाबळीच्या चुकीच्या आरोपाखाली तरुंगा मध्ये पाठवले होते. काहीही चूक नसताना या तरुणाला तुरुंगात जावे लागले. न्यायालयात तो स्वतःचं निर्दोषत्व सिद्ध करू शकला नाही. समाजात त्याची बदनामी झाली त्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केली. अर्थात अशी आत्महत्या करणारा अतुल सुभाष हा पहिला तरुण नाही याआधीही अनेक तरुणांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. ज्या तरुणांमध्ये आत्महत्या करण्याची हिंमत नसते ते तरुण पत्नीचा जाच मुकाटपणे सहन करतात किंवा घर सोडून आश्रमात जातात. औरंगाबादेतील वाळूंज भागात असाच पत्नी पिढीत पुरुषांचा आश्रम आहे. या आश्रमात काही पत्नी पिढीत पुरुष राहतात हे पत्नी पिढीत पुरुष वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी पिंपळ पूजन करून पिंपळ पौर्णिमा साजरी करतात. हे पुरुष दरवर्षी पिंपळ पौर्णिमा साजरी करतात. आमच्या बायकांनी आम्हाला इतका त्रास दिला आहे की आम्ही त्यांच्यासोबत सात जन्मच काय सात सेकंदही संसार करू शकत नाही म्हणूनच आम्हाला अशा प्रकारच्या बायका देण्यापेक्षा कायमस्वरूपी मुंजा ठेव अशी प्रार्थना ते यम आणि मुंजाला करतात. हा प्रकार काहीसा विचित्र वाटत असला तरी खरा आहे. कौटुंबिक हिंसाचारात महिलांवरच अन्याय अत्याचार होतो. महिलाच हिंसेचा बळी ठरतात हे आपल्याला माहीत आहे पण पुरुषही कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरतात यावर अजूनही अनेकांचा विश्वास बसत नाही याला कारण आहे आपली पुरुष प्रधान संस्कृती. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते, आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात. ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते अतुल सुभाष सारखे तरुण आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. कायदाही महिलांच्याच बाजूने आहे. महिलेचा पती व त्याच्या कुटुंबियांकडून होणारा छळ रोखण्यासाठी ४९८ ( अ ) हा कायदा करण्यात आला. पत्नीने पती विरुद्ध तक्रार दिली तर त्याची तातडीने दखल घेतली जाते. पत्नीवर अन्याय करणाऱ्या पतीला तात्काळ अटक केली जाते पण पतीला पत्नी विरुद्ध कारवाई करायची असेल, तर आपल्या देशात कौटुंबिक हिंसाचार अधिनियमना सारखा कायदा उपलब्ध नाही. सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. विकसित देशांमधील लिंग निरपेक्ष कायदे पुरुषांना महिलां प्रमाणे संरक्षण तर देतातच ; शिवाय पुरुष पीडित असू शकतात या वास्तवाचा स्वीकारही करतात. त्यामुळे तिथे या विषयावर संशोधनही होत असते आपल्या देशात पुरुषही महिला अत्याचाराने पीडित असतात हे वास्तव अजूनही स्वीकारले जात नाही. पुरुष कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरुच शकत नाही अशी धारणा असणारे लोक सामान्यतः असा तर्क देतात की पुरुष हे महिलांपेक्षा बलवान असतात अशा स्थितीत महिला पुरुषांवर आघात कशा करू शकतात? पण एका संशोधनात असे सिद्ध झाले आहे की हिंसक संबंधांमध्ये महिलाही पुरूषां इतकीच आक्रमक होऊ शकते. शिवाय मानसिक छळ करण्यात महिलांचा हात कोणीही धरू शकणार नाही. विशेषतः जे संवेदनशील मनाचे पुरूष असतात ते अशा हिंसाचाराला बळी पडतात त्यामुळे महिलां प्रमाणेच पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण द्यावे.

**श्याम बसप्पा ठाणेदार, पुणे, ९९२२५४६२९५**

# जे ई एस महाविद्यालयात महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जे ई एस महाविद्यालय व इनरव्हील क्लब ऑफ सेंटर जालना तर्फे महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाची तीन दिवसीय कार्यशाळा महाविद्यालयात आयोजित करण्यात आली होती. यावेळी जालना सायबर गुन्हे अन्वेषण शाखेचे श्री संजय सोनवणे यांनी महिलांनी संरक्षण कसे करावे याविषयी माहिती सांगितली.



महिला स्वसंरक्षण कार्यशाळेच्या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा.प्रवीण बाफना हे होते ,व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून सायबर गुन्हा अन्वेषण शाखा जालन्याचे श्री संजय सोनवणे, तसेच महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा.करुणा वासनिक, पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड, कार्यक्रमाच्या संयोजका, इनव्हीलर क्लब ऑफ सेंटर जालनाच्या अध्यक्षा

प्रा. शिल्पा कवाना उपस्थित होत्या.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना श्री संजय सोनवणे म्हणाले की महिलांनी व मुलींनी स्वसंरक्षण करण्यासाठी समाजातील दृष्ट प्रवृत्तीच्या लोकांपासून सावध राहून, काही वाईट प्रसंग घडल्यास त्वरित ११२ नंबर ला डायल करावे, १९ २० हा नंबर डायल करून सायबर गुन्हे शाखेत आपली तक्रार दाखल करावी यामुळे त्वरित मदत प्राप्त होऊन संबंधित गुन्हेगारास चौकशी साठी ताब्यात घेण्यात येते . स्थानिक पोलीस ठाण्यातही महिला तक्रार दाखल करू शकतात. सध्या ऑनलाईन फसवणुकीचे गुन्हे मोठ्या प्रमाणात घडत असून महिला मुलींची व नागरिकाची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे यापासून सावध राहावे. कुठल्याही आमिषाला व गोड बोलण्याला बळी पडू नये, संबंधित व्यक्ती फ्रॉड वाटल्यास त्वरित तक्रार दाखल करावी असेही श्री सोनवणे यांनी सांगितले.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना प्राध्यापक प्रवीण बाफना म्हणाले की सध्या ऑनलाईन फसवणूक मोठ्या प्रमाणावर होत आहे. यामधे समाजातील प्रतिष्ठित वर्ग सुद्धा बळी पडताना दिसतो. ऑनलाइन व सोशल मीडियावर ठगांचे प्रमाण जास्त झालेले आहे यापासून सर्वसामान्य नागरिकांनी युवक -युवतींनी सावध राहावे, असेही श्री बाफना यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. वर्षा झवर यांनी केले. तर तर उपस्थितांचे आभार प्रा. कविता बागडी यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थिनी व महिला प्राध्यापिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# राजमाता जिजाऊ शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** राजमाता जिजाऊ इंग्लिश स्कूल येथे सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्प अर्पण करण्यात आले याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. सौ. सुरेखाताई संजय लहाने तसेच या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी गौतम म्हस्के टेंभुर्णी सरपंच देशमाने सर ए पी आय टेंभुर्णी सुनील देशमुख ,विष्णू रोकडे ,संदीप परसने ,दत्ता कराळे ,जयश्री बोराडे, दिपाली भिसे, नसरीन सय्यद, सलमा शहा, शबाना शहा, कैलास कोरडे ,विनोद वरगने ,संदीप शिंदे हे होते. सर्वप्रथम या कार्यक्रमांमध्ये मान्यवरांची हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक एस .आर फलटणकर सर यांनी केले यानंतर शाळेचे अध्यक्ष सुयश लहाने यांनी सुद्धा सांस्कृतीक कार्यक्रमांमध्ये मुलांना सखोल मार्गदर्शन केले तसेच टेंभुर्णीचे सरपंच गौतम म्हस्के यांनी सुद्धा मुलांना संस्कृतीक कार्यक्रमाचे महत्त्व पटवून दिले . या कार्यक्रमांमध्ये मुलांनी आपल्या कलागुणांना वाव दिला व चांगल्या प्रकारे नृत्य करून प्रेक्षकांची मने जिंकली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी सोळुंके व शेख नवाज यांनी केले तसेच भक्ती धनवाई, सय्यद मुद्दतसिर, सय्यद खिजर ,भावेश कांबळे यांनी सुद्धा सूत्रसंचालनामध्ये सहभाग घेतला होता. तर आभार प्रदर्शन कृष्णा बनकर यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षक विनोद उबरहंडे, अमोल तेलंग्रे, नवाज शेख, दत्तात्रय गाडेकर, विमल एस, भागवत लहाने, विनोद धवलीया, वनिता बोडखे, रोहिणी सोळुंके, वैष्णवी पिंपळे, सविता बकाल, स्नेहल रिंढे, सुनीता मोरे, अश्विनी दुनगहु, विमल मदन, प्रभाकर रोकडे, केशव पंडितकर, बाळू चव्हाण, अंकुश जोशी, इत्यादींची उपस्थिती होती.




# सैन्य दलातील अधिकारी पदाच्या पुर्व प्रशिक्षणाची संधी

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्विस सिलेक्शन बोर्ड या परीक्षेची मोफत पुर्व तयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे महाराष्ट्र शासनाकडून एसएसबी कोर्स क्र. ६४ आयोजित करण्यात येणार आहे. तरी जालना जिल्ह्यातील इच्छूक युवक-युवतींनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे गुरुवार दि. १३ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत मुलाखतीस हजर रहावे. संपुर्ण प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना नि:शुल्क प्रशिक्षण, निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सअप क्र. ९१५६०७३३०६ वर संपर्क करावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अल्पसंख्याक हक्क दिनाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** अल्पसंख्याक हक्क दिवस म्हणुन १८ डिसेंबर २०२४ हा दिवस साजरा करण्यात येणार आहे. अल्पसंख्याक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशिर हक्काची जाणीव, माहिती देण्यासाठी बुधवार दि.१८ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तरी नागरिकांनी अल्पसंख्याक हक्क दिन कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

पान १ वरुन

## आरोग्याच्या बाबतीत ...

ॲड. दीपक शिवतारे यांच्याहस्ते इन्नरव्हील क्लब ऑफ जालना होराझनच्या अध्यक्ष ॲड. अश्विनी धन्नावत, इन्नरव्हील क्लबच्या अध्यक्ष मधूलता भक्कड, इन्नरव्हील क्लब ऑफ जालना सेंट्रलच्या अध्यक्ष शिल्पा कावना यांनी आरोग्य किट पिंपरखेड ग्रामपंचायतकडे सुपूर्द केली. यावेळी होराझनतर्फे ग्रामीण महिलांसाठी लावण्यात आलेल्या स्टॉलवरून २०० मेनस्ट्रोल कप मोफत वाटप करण्यात येऊन मासिक पाळीत ते कसे वापरायचे, पर्यावरण संरक्षणासाठी आणि आरोग्याच्यादृष्टीने ते किती हितकारक आहे, याबाबत प्रबोधन करण्यात आले.

यावेळी ॲड. अश्विनी धन्नावत यांनी आरोग्य किट देण्यामागील उद्देश स्पष्ट केला. त्या म्हणाल्या, अनेक कुटुंबे अशी आहेत ज्यांना आजारपणात हॉस्पिटल बेड, व्हीलचेअर, वॉकर यासारखी साधने खरेदी करणे परवडत नाहीत. अशा गरजू व्यक्तींना ग्रामपंचायतीच्या माध्यमातून मोफत ही साधने उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. ग्रामीण भागात आरोग्याच्या बाबतीत सकारात्मक बदल घडवण्याचा, ग्रामस्थांचे जीवन सुसह्य करण्याचा आमचा प्रयत्न आहे. ग्रामीण भागातील आरोग्याच्या गरजा लक्षात घेऊन ही किट प्रदान करण्यात आली असून, आजारी व्यक्तींचे जीवन सुसह्य होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# नागपूर विधानभवनावर मोर्चा

## चर्मकार बांधवांनी उपस्थित राहावे - अंबादास घायाळ

**मंठा । प्रतिनिधी -** नागपूर विधानभवनावर प्रचंड महा मोर्चा ला जास्तीत जास्त संख्येने चर्मकार बांधवांनी उपस्थित राहावे अंबादास घायाळ याविषयी सविस्तर वृत्त अशी की राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने दि.१९ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष बबनरावजी घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली समाजाच्या विविध मागण्यासाठी नागपूर विधानभवनावर प्रचंड मोर्चाला जास्तीत जास्त चर्मकार समाज बांधवांनी गुरुवारी १९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता यशवंत स्टेडियम नागपूर येथून निघणाऱ्या मोर्चाला जास्तीत जास्त चर्मकार समाज बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रीय चर्मकार संघ मंठा तालुका अध्यक्ष अंबादास घायाळ यांनी केले आहे



यावेळी युवा आदर्शशी बोलताना अंबादास घायाळ म्हणाले की समाज्याच्या विविध मागण्यांचे निवेदन यापूर्वी मुंबई येथे मा. मुख्यमंत्री महोद्यांना देण्यात आले होते, व त्यावर तातडीने कार्यवाही करावी यासाठी नागपूर येथे हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने दि.१९/१२/२०२४ रोजी सकाळी ११ वाजता विधानभवन नागपूर येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे वतीने मोर्चाचे आयोजन केले आहे.

सदर मोर्चा यशवंत स्टेडियम येथुन निघून विधानभवन नागपूर येथे जाईल. या करीता जास्तीत जास्त संखेने चर्मकार समाजबांधवांनी मोर्चासाठी उपस्थित राहवे, असे आव्हान राष्ट्रीय चर्मकार संघ मंठा तालुका अध्यक्ष अंबादास घायाळ यांनी केली आहे.

# नातेवाईकांनी मारहाण केल्याने सुंदर नगर येथे एकाचा मृत्यू

## नातेवाईकांनी चंदनझीरा पोलीस ठाण्यात आणला होता मृतदेह

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील सुंदर नगर येथे किरायाने राहत असलेल्या एका तरुणास मागील कौटुंबिक कारणावरून जबर मारहाण केल्याने फारूक निजाम शेख या तरुणाच्या मृत्यू झाला. मयत तरुण हा बदनापुर तालूक्यातील देवगाव येथील राहीवाशी असून सध्या सुंदर नगर येथे किरायाची खोली करून राहत होता.

सदरील घटना रात्री च्या सुमाराची असून मयताच्या गळ्याला दोरीच्या फासाचे वण असल्याचे नातेवाईकांचे म्हणणे आहे. आज दिनांक १७ मंगळवार रोजी सकाळी अकरा वा. दरम्यान मृतदेह शव विच्छेदनासाठी शहरातील शासकीय सामान्य रुग्णालयामध्ये पाठवण्यात आला असून शवविच्छेदनानंतर नातेवाईकांनी थेट चंदनझीरा पोलीस ठाणे गाठून मृतदेह




चंदनझीरा पोलीस ठाण्यात आणून ठेवला. जोपर्यंत मारेकऱ्यांना अटक होऊन खुनाचा गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मृतदेह हलवणार नसल्याची भूमिका नातेवाईकांनी घेतली. या घटनेने परिसरामध्ये एकच कळबळ उडाली.

## सकलेचानगर प्रीमियर लीग बॉक्स क्रिकेट स्पर्धा

# केनिया टर्फवर रंगणार सामने; सात संघ सहभागी होणार

**जालना । प्रतिनिधी** - जालना येथे २१ ते २३ डिसेंबरदरम्यान सकलेचानगर प्रीमियर लीग बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

जुनी एमआयडीसीमधील केनिया टर्फवर खेळविण्यात येणाऱ्या या प्रीमियर लीगमध्ये सालासर स्ट्रायकर्स, टेक्नोसॉफ्ट रॉयल्स, रुद्र स्ट्रायकर्स, एसजी स्ट्रायकर्स, बी. टायगर, सुपर फाइटर आणि एलएफएस कावले ब्रदर्स हे सात संघ सहभागी होत आहेत. कॉलनीतीलच हे ७ संघ असून, सकलेचानगर व मानकरतननगर कॉलनीतील लहानांना मोठ्याची आणि म ोठ्यांना लहानाची ओळख व्हावी, कॉलनीची एकता वाढावी, या हेतूने गेल्या पाच वर्षापासून प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. त्यात तेरा वर्षापासूनची मुले ते चाळिशीपर्यंतचे नागरिक सहभाग नोंदवितात.




विजेत्या व उपविजेत्या संघासह मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज आणि गोलंदाजांचा ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात येणार आहे.

नागरिक आणि क्रिकेट रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून क्रिकेटचा आनंद लुटावा, असे आवाहन सकलेचानगर प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या संयोजन समितीचे दिनेश बरलोटा, कैलास तोष्णीवाल, आकाश अग्रवाल, संदीप घिके, धनंजय झंवर, गिरीश मोटवानी यांनी केले आहे.




# दत्त जयंती निमित्त पुरुषोत्तम दत्त मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम



**मंठा । प्रतिनिधी -** दत्त जयंतीनिमित्त शहरातील देवी रोडवरील पुरुषोत्तम दत्त मंदिरात प्रति वर्षे प्रमाणे याही वर्षी विविध धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

पुरुषोत्तम दत्त मंदिरात दत्त जयंती निमि त्त पारायणा सह भजन कीर्तन आधी धार्मिक कार्यक्रम सह दत्त जयंती अति उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी भक्तजन म ोठ्या संख्येने उपस्थित होते. देवी रोडवरील निसर्गरम्य वातावरणातील पुरुषोत्तम दत्त मंदिरात महाप्रसादाची आयोजन करण्यात आले होते यावेळी पंचक्रोशीत भक्त जनासह राजकीय नेते पत्रकार पोलीस नगराध्यक्ष नगरसेवक यांनी म हाप्रसादाचा लाभ घेतला प्रति वर्षाप्रमाणे विविध धार्मिक कार्यक्रमाने खंड न पडता दत्त जयंती याहीवर्षी दत्त जयंती अति उत्साहात पार पडली असल्याची माहिती पुरुषोत्तम दत्त मंदिराचे प्रस्थ अशोक मुळे यांनी दिली आहे.

